**पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर**
Email : dahosolapur1@gmail.com
**जाक्र. जिपसो/ पशुसं/तां/ ३५८ /२०२३**
**सोलापूर, दिनांक :- २२ / ०८ / २०२३**

---

**प्रति,**

**पशुधन विकास अधिकारी (विस्तार),**
**पंचायत समिती -------------------(सर्व)**

**विषय:- जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२३-२०२४ अंतर्गत लाभार्थी अर्ज मागविणेबाबत..**

१. आर्थिक दृष्टया मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५ % अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे
२. ५०% अनुदानावर पशुपालकांना मिल्कीग मशिन पुरविणे

उपरोक्त विषयान्वये सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजनेमधून आर्थिक दृष्टया मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५ % अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे व ५०% अनुदानावर पशुपालकांना मिल्कीग मशिन पुरविणे ही योजना राबविण्यास मान्यता प्राप्त झाली असून या योजनांचे अर्जाचे नमुने सोबत जोडुन आपणाकडे पाठविणेत येत आहेत. सदर योजनेचे अर्ज **दिनांक :- २५/०८/२०२३ पासुन दिनांक : २५/९/२०२३** पर्यत पंचायत समिती स्तरावर स्विकारण्यात यावेत. लाभार्थीचे अर्ज स्विकारून/ प्राप्त करून आवश्यक त्या कागदपत्राची छाननी/पडताळणी आपले स्तरावर करून पात्र/अपात्र लाभार्थी यादी, अर्ज स्विकारलेचे अंतिम मुदतीनंतर आठ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करणेत यावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची गांभियाने नोंद घ्यावी. सदर योजना ही जिल्हा परिषद उपकरातुन असल्याने संबंधीत तालुक्यातील पदाधिकारी व मा. जि. प सदस्यांना सदर अर्जाची प्रत देऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच सदर योजनेची निवड ही दैव चिठ्ठी पध्दतीने करण्यात येणार असून सदर योजनेमध्ये सर्व लाभार्थीचे अर्ज स्विकारण्यात यावेत.

आपणाकडुन अर्ज प्राप्त झालेनंतर त्यामधुन निवड समितीमार्फत पात्र लाभार्थीची निवड करणेत येईल सदर अर्जाचा नमुना www.zpsolapur या संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

सदर योजनेची सॉफ्ट कॉफी ही **DVBW-Surekh Font Size १४-१६** या फॉन्टप्रमाणे असावी या व्यतीरिक्त कोणत्याही Font मध्ये देण्यात येवू नये. इतर सॉफ्ट कॉफी स्विकारली जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सोबत:-** योजना अर्जाचा विहित नमुना

**(संदिप कोहिणकर)**
**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

**प्रत:-माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
२. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त सोलापूर
३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

**प्रत:- योग्य त्या कार्यवाहीस्तव**

गट विकास अधिकारी पंचायत समिती -------------------(सर्व)